# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 14/08/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## नागपूर ग्रामीण जिल्हयात ई–ऑफिस प्रणाली व्दारे दि. १५/०८/२०२३ पासुन कार्यालयीन कामकाज सुरू

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक संकीर्ण–२०२३/प्र.क्र.०२/१८(र.व.का.) दिनांक ०२ फेब्रुवारी २०२३ परिपत्रकानुसार राज्य शासनामध्ये शासकीय कामकाजामध्ये गती व्हावी, कामकाजात सुसुत्रता व्हावी, दस्ताऐवज व माहिती सुरक्षित राहावी, कार्यालयात सादर केलेली टपाल ही संबंधीतास त्वरीत व जलद गतीने प्राप्त होवून त्यावर निर्णय प्रक्रिया सुलभ व्हावी याकरीता महाराष्ट्र शासनाने सर्व विभागाकरीता ई–ऑफिस प्रणाली निर्माण केली आली आहे.

सदर ई–ऑफिस प्रणालीमध्ये कार्यालयात येणाऱ्या टपाल ज्यामध्ये कार्यालयात प्रत्यक्ष प्राप्त होणारे टपाल (Physical Dark) व इलेक्ट्रॉनिक माध्यमातुन येणारे टपाल (Electronic Dark) स्विकारण्यात येईल. सदर टपालीमध्ये अर्जदार/तक्रारदार यांनी आपला मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी देणे आवश्यक आहे. जेणेकरून टपाल सादर केल्यास त्यांना मोबाईलवर किवा ईमेलवर संगणक क्रमांक (पोचपावती क्रमांक) प्राप्त होईल. सदर संगणक क्रमांकाव्दारे सदर अर्जदार/तक्रारदार आपल्या टपालाची शहानिशा करू शकतील.

त्यानुसार पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी ई–ऑफिस प्रणाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या सर्व घटक कार्यालयामध्ये अंमलात आणण्याबाबत निर्देशती करण्यात आले आहे. त्यानुसार पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर अंतर्गत सर्व पोलीस स्टेशन, पोलीस उप विभागीय कार्यालय व पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व शाखेत दि. १५/८/२०२३ पासुन ई–ऑफिस प्रणाली सुरू करण्यात येत असुन यापुढे या कार्यालयात येणारे टपाल केवळ ई–ऑफिस प्रणालीव्दारे स्विकारण्यात येणार आहे.

यामध्ये मा. श्री. विशाल आनंद (भापोसे), पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. डॉ. संदिप पखाले, अपर पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण, मा. श्री. विजय माहुलकर, प्रभारी पोलीस उप अधिक्षक (गृह), नागपूर ग्रामीण व श्री उमेश फुंदे, कार्यालय अधिक्षक, नागपूर ग्रामीण यांचे मोलाचे मार्गदर्शन असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली ई–ऑफिस प्रणाली राबविण्यात येत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. उमरेड :– दिनांक १०/०८/२०२३ चे ०९.०० वा. सुमारास पो.स्टे. उमरेड हद्दीत फिर्यादी व तिचा मुलगा व मुलगी सर्व जेवन केले आणि रात्री झोपले रात्री ०१/०० वा. सुमारास फिर्यादीला जाग आली तेव्हा तिची मुलगी फिर्यादीला दिसली नाही म्हणुन फिर्यादीने तिच्या मोबाईलवर फोन केला तर ती बोलली मी माझा मैत्रीणीसोबत दवाखान्यात आहे. उदया सकाळी ०६/०० वा. घरी येते परंतु ती सकाळी घरी आली नाही. म्हणुन फिर्यादीने तिच्या मोबाईलवर फोन केला तर तिचे दोन्ही सिम बंद दाखवित आहे. तिचा नातेवाईकांकडे व आजुबाजुला शोध घेला परंतु कुठेच मिळुन आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे मुलीला फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक सुचीता मंडवाले पोस्टे उमरेड मो. नं. ९७६३२३४५४८ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**